म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ७३५९

# दु समाज

आणि

# पतित स्त्रियांची सुधारणा.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्वतः प्रत
नं. निबंध
ता.
नोंद नं. ७३५९

लेखक —

विश्वेश्वर.

REFBK-0004341

ठाणें.

किंमत ४ आणे.

" Men's faults do seldom to themselves appear;
Their own transgressions partially they smother:"

:—*Shakespeare.*

# हिन्दु समाज

आणि

Presented to Mr. S. M. Abhyankar, B.A. LL.B with B. C. of Na. Sathe 26-11-38

# पतित स्त्रियांची सुधारणा.

४३४१
REFBK-0004341

किंमत ४ आणे.

# केवळ परिस्थितीमुळे !

लोकमत जागृत करण्यासाठी लिहिलेले प्रस्तुत छोटेखानी पुस्तक छापखान्यात जाता क्षणीच त्याने आपल्या जन्मदात्याची जीवनदायी रुपेरी शृंखला एका घावासरशी अकारण तोडून त्याला आजवर बेरोजगार करून ठेविले. १९२९ च्या ऑगस्ट महिन्यात पुस्तक छापून तयार झालें असताहि केवळ माझ्या परिस्थितीमुळे आतापर्यंत ते छापखान्यात खितपत पडले. वेश्योद्धारातील नाजूक व मुर्केबाज अडचणी त्या विषयावर लिहिण्यात आलेल्या इवल्याशा पुस्तकालाहि बाधल्या ! टीचभर पोटाच्या व्यापाकरिता तर नव्हेच नव्हे, परंतु केवळ वाङ्मयव्यवसायासाठी जोडेफाड करून थोड्याशा रकमेची तजवीज कोणाहि परिचित धनिकाकडून अगर निकटच्या चहात्याकडून वेळेवर झाली नाही !

माझ्या ज्ञातिसंस्थांपैकी **जानार्दन राघोबा वनमाळी एज्युकेशनल् ट्रस्ट**, मुंबई, या संस्थेच्या उदारमनस्क ट्रस्टीवर्गाने—श्री. **रामचंद्र विनायक परळकर**, ( मॅनेजिंग ट्रस्टी ), यांच्या शिफराशीमुळे—माझ्या लेखनव्यवसायाला प्रोत्साहन म्हणून जी अत्यल्प देणगी दीड वर्षापूर्वी दीली, ती छापखान्याकडे भरूनहिं बिलाची भरपाई न झाल्यामुळे व्यवहारदृष्ट्या पुस्तके छापखान्यातच पडू देणे मला इष्ट वाटले. छापखान्याचे मालक श्री. **बी. जी. गण्डभीर** यानी माझ्या परिस्थितीकडे लक्ष दिल्यामुळे व माझे परम स्नेही श्री. **केसरीनाथ माधवराव नाडकर्णी** यानी प्रस्तुत पुस्तकाच्या प्रकाशनाची जबाबदारी आपल्यावर घेऊन माझ्या डोकीवरील भार हलका करण्याचे ठरविल्यामुळे माझ्या या कृशांगी व अभागी अपत्यावरील ग्रहदशेचा पाश सैल झाला ! रसिक वाचक त्यावर प्रेम करतील या आशेने ते त्यांच्या कडेखांद्यावर देण्याला मला आज बरेच समाधान वाटत आहे !

लोअर चेंदणी, ठाणे,
ता. १० नोव्हेंबर १९३१.

रसिकांचा नम्र,
**विश्वेश्वर.**

---

**सूचना**:—या पुस्तकाच्या आरंभी '**माझ्या एका गोवेकर बंधूचें मत**' हा मजकूर ज्या पानावर पूर्ण झाला आहे, ते पान पूर्वीच्या छापखान्याकडून या पुस्तकाच्या काही प्रतींच्या शेवटी **चुकीने शिवले गेले आहे.**

श्री. विश्वेश्वर यांची खालील दोन्ही पुस्तकें प्रसिद्ध झाली.

किम्मत ] मेलेल्या नाटककारांचे [ आठ आणे.
जिवन्त नाटक !

—————:०:—————

किम्मत ] रंगभूमीवरील व्यासपीठ ! [ एक रुपया.

—————:०:—————

पुस्तकें मुंबईत सर्व बुकसेलराकडे मिळतात.

केसरीनाथ माधवराव नाडकर्णी,
ओवळेकर हाऊस, बांगडगल्ली,
गिरगाव बॅकरोड, मुंबई. नं. ४.

कामत प्रिंटिंग प्रेस, मुंबई, नं. ४.

[ दे. भ. बॅरिस्टर मुकुंदराव रा. जयकर यांचा मार्मिक व सडेतोड अभिप्रायः—]

हिन्दुसमाजांत नवीन जाणीव अलिकडे उत्पन्न झाल्याचीं जीं कांहीं थोडीं-बहुत चिन्हें दिसतात त्यांपैकीं '**हिंदु-समाज व पतित स्त्रियांची सुधारणा**' असा विषय लोकांपुढें यावा, ही गोष्ट होय. **विश्वेश्वरासारख्या** तरुण व होतकरू लेखकाचें या विषयाकडे लक्ष लागून, 'वरपंगी कर्णकठोर' भासणाऱ्या अशा भाषेंत ह्या प्रश्नाचें हिडिस स्वरूप लोकसमाजापुढें मांडण्याचें त्यानें धार्ष्ट्य करावें, ही खरोखर आनंदाची गोष्ट.

पुष्कळ रोग असे असतात, कीं त्यांचें खरें स्वरूप स्पष्टपणें कळल्याशिवाय निदान व चिकित्सा ठरवितां येत नाहीं. रोगाची परीक्षा होण्यापूर्वी धन्वंतऱ्यास रोगाचें खरें स्वरूप प्रांजलपणें रोग्याकडून कळलें पाहिजे. तेंच त्यानें लपवून ठेविलें तर रोगास योग्य उपाय होणें अशक्यच. 'पतित' स्त्रियांचा जबर रोग हिंदुसमाजांत आज कित्येक शतकेंपर्यंत फैलावत आलेला आहे. धार्मिक रूढीमुळें त्याचें घातक स्वरूप पुष्कळ वेळां झांकून गेलेलें आहे. ऐषआराम व सुखोपभोग यांच्या लालसेनें प्रतिष्ठित म्हणविणाऱ्या लोकांत देखील ह्या समाजिक रोगाबद्दल जितका तिटकारा असावा तितका बहुशः दिसत नाहीं. अशा स्थितींत विश्वेश्वरानें लोकांचें लक्ष या विषयाकडे लावण्याचा उपक्रम केला, हें अभिनंदनीय आहे. हा भाषेचा प्रश्न नाहीं. भाषा कडक, मर्मभेदी, मृदु किंवा मळमळीत वापरणें हा ज्याच्या त्याच्या स्वभावाचा व तळमळीचा प्रश्न आहे. समाजांत लोकप्रिय झालेला व्यसनें पुष्कळ वेळां कडक भाषेंतच चव्हाट्यावर आणण्याची जरूर वाटत असते. म्हणून भाषेच्या भानगडींत न पडतां, ह्या लहानशा पुस्तकांतील विषयाकडेच सुज्ञ वाचकांचें लक्ष लागेल, व त्यायोगें या विषयाला अनुकूल असें लोकमत तयार होईल अशी आशा आहे.

मुंबई,
ता. २६।८।२९.

मुकुंद रा. जयकर.

# माझ्या एका गोवेंकर बंधूचें मत.

माझे मित्र श्री. विश्वेश्वर यांनीं प्रस्तुत छोटयाशा पुस्तकांत रेखाटलेल्या पतित स्त्रियांच्या दुर्दैवी चरित्राकडे हिंदुसमाजाच्या घटकांनीं अवश्यमेव लक्ष पुरविलें पाहिजे.

आज हिन्दुसमाजांतील स्त्रीवर्गाची, धर्माच्या व शास्त्राच्या नांवावर भट-भिक्षुक, देवस्थानचे महाजन व कामातुर बेरड, ह्यांच्याकडून कशी विटंबना होत आहे, ह्याचें मूर्तिमंत दृश्य श्री. विश्वेश्वर ह्यांच्या ह्या छोट्याशा पुस्तकांत दिसून येण्यासारखें आहे.

हिंदुसमाजसंघटणेच्या लांब लांब बाता झोंकणाऱ्यांचा अलिकडे भरंसाट सुकाळ माजलेला दिसून येतो; पण हिंदुसमाजाच्या अंतरंगांत धर्माच्या व रूढीच्या गोंडस नांवाखालीं किति घाण सांचून राहिली आहे, ह्याचा मुळींसुद्धां विचार न करतां, ह्या बाह्यांगीं संघटणाच्या बाता हिंदुसमाजाच्या कितपत पचनीं पडतील, ह्याचा हिंदुधर्माची शेखी मिरविणाऱ्यांनीं व विशेषत: जगद्‌गुरुत्वाची बेरंगी जरीशाल सफाईनें पांघरून हिंदुधर्माचा जामदारखाना राखणाऱ्या ' भोंदूबुवां ' नीं अवश्य विचार करावयास पाहिजे.

गोव्यांतील गायकसमाजाच्या बाबतींत लेखकानें थोडीशीच माहिती दिलेली आहे. गोव्यांतील गायकसमाजाची आज जी कल्पनातीत अवनति झालेली दिसून येत आहे, त्याला सर्वस्वी भिक्षुकशाही व महाजनशाहीच कारणीभूत झालेली आहे. देवाच्या नांवावर ह्या भट-भिक्षुकांनीं व महाजन लोकांनीं ' शेंस ' विधिसारख्या हिडीस प्रकारांना धर्माचें व शास्त्राचें स्वरूप देऊन अज्ञ व भोळ्या गायक-समाजाला अनीतीच्या मार्गाला लावण्याचें बेशरम कृत्य अंगिकारलेलें आहे. या अनीतीच्या नरकयातना आतांशा गायक-समाजाला जाचक होऊं लागल्यामुळें त्याची ती दिशा बदलण्याचें बऱ्याच समाजधुरीणांचे प्रयत्न चालू

ग्रं. ७२५५ वि. ६५४ ४३४७

# आम्ही काय म्हणतों ?

प्रस्तुतचा टीचभर लेख एकवार प्रसिद्ध झाला असतां, तो पुन्हां स्वतंत्ररीत्या छापविण्यांत प्रस्तुत लेखकाचा उद्देश असा, कीं सारींच वर्तमानपत्रें साऱ्याच वाचकांहातीं लागत नसतात. म्हणून एखाद्या लेखकाचे विचार बहुजनसमाजांतील शेकडा पन्नास व्यक्तींना तरी कळावेत, त्या विचारांची त्या व्यक्तींकडून आपल्या सवडीनुसार शांतपणें विचारणा व्हावी, टीका प्रतिटीका होऊन, परस्परांतील मतभिन्नत्वाचें किल्मीष पार नाहींसें व्हावें, आणि मतैक्याचें वारें सार्वत्रिक फैलवून, आपल्या सामाजिक प्रगतीला योग्य तऱ्हेचें सहाय्य मिळावें.

* * *

आज आम्ही परकी राजसत्तेच्या जोखडाखालीं असल्यामुळें निवळ मेषपात्र बनलों आहोंत. आमची प्रगति आम्हीच करून घेण्याचे मुळांतले मार्गच बंद करण्यांत आले आहेत. आम्हा हिंदी लोकांवर आमच्या ' दयाळू ' सरकारचा विश्वास नाहीं, म्हणून आम्हाला वरच्या योग्यतला जाण्याची मुभा ठेविली नाहीं. कारण असें केलें, तर आम्हावरील राजकीय सत्ता टिकविणें त्यांना जड जाईल. हिंदुस्थानांतील ब्रिटिशांचें जीवन सुखकर होणार नाहीं, वगैरे तऱ्हेच्या धोरणांनींच इंग्रजी राज्यव्यवस्थेचें जाळें विणलें गेले आहे. सारांश, आमचे आम्हीच येनकेन प्रयत्नांनीं व सामुदायिक चळवळांनी आमचा दर्जा, आमचें ज्ञान, आमची कर्तबगारी, हीं ' गौरीशंकर ' शिखरावर नेऊन ठेवूं, शिवाजी, नेपोलियन, रामदास, काव्हूर, मॅझिनी, लेनिन, गॅरिबॉल्डी, विवेकानंद, रामतीर्थ, दयानंद, शेरशहा, अकबर, अलबेरुनी, वगैरेसारख्या विभूती हिंदी राष्ट्रांत प्रत्येक ठिकाणीं निर्माण होण्याकरितां तसल्या तऱ्हेची परिस्थितीहि निर्माण करण्याची कांहीं जबाबदारी आम्हांवर आहे, अशी ज्या वेळीं आमची खात्री होईल, तेव्हांच जगांतील उन्नत राष्ट्रांशीं आम्हाला टक्कर मारतां येईल, व आमचें गतवैभव पुनश्च मिळवितां येईल, वगैरे गोष्टी खऱ्या असल्या तरी अशा साधनाकरितां—

## सर्वांगपूर्ण स्वराज्याकरितां

—आम्ही आमच्यांतील सामाजिक व धार्मिक भेदभाव काढून टाकावयास पाहिजेत. हिंदु म्हटला कीं, 'क्ष'कीरणा ('X-Ray') नें काढलेला त्याच्या काळजाचा फोटो हा एकजातच दिसला पाहिजे.

प्रस्तुत विषयाचा मथळा पाहतांच लेखकाबद्दल कुणाला अनादर वाटून त्याच्याबद्दल कदाचित् तिटकाराहि उत्पन्न होईल, हें आम्हीं पूर्ण जाणून आहोंत. परंतु सोंवळ्या मनाच्या कांहीं वाचकांनीं विसरतां मात्र कामा नये, कीं राष्ट्रीय प्रगतीला राजकारणवादाची जितकी म्हणून आज अवश्यकता आहे, तितकीच किंबहुना अधिक अवश्यकता सामाजिकवादाचीहि आहे. हिन्दी लोकांचें म्हणण्यापेक्षां हिन्दूंचें संघटण झालें पाहिजे. म्हणजे त्यांची बेसुमार रिक्रूटभरती झाली पाहिजे अशांतला भाग नव्हे. तर बौद्धिक, कायिक व आर्थिक असें एकजीव संवर्धन होऊन त्यांचें संघटण झालें पाहिजे. पुराणजनकल्पित भेदभाव शक्य त्या प्रमाणांत नाहींसे झाले पाहिजेत.

सामाजिक विषयाच्या अंगभूत असणाऱ्या अनेक उपविषयांपैकीं प्रस्तुतचा विषय हा एक आहे. त्यासंबंधी कुणि दोन शब्द लिहिणें हा जर

## सोंवळ्या मण्डळीच्या मतें गुन्हा

ठरत असला, तर तें आश्चर्यच होय! प्रस्तुत लेखक आपल्या रांगत्या लेखणीनें सुमारें आठ नऊ वर्षं प्राथमिक लेखनव्यवसायांत लुडबुड करतो आहे, तेव्हां त्याला आपले विचार प्रदर्शित करण्याला या विषयापुरते दुसरे विषयच नव्हते कीं काय, अशी शंका कुणि घेतल्यास ती चूक ठरेल. किंवा ज्या वेश्यावर्गाकरितां त्यानें इतका टाहो फोडला आहे, त्या वर्गाशीं त्याचें कांहीं सलगीचें—प्रेमाचें नातें असावें असा कुणीहि आपला (कु) तर्क चालवूं नये. त्या वर्गाची सुधारणा झाली पाहिजे असें जाहीररीत्या बोलणें, लिहिणें किंवा त्याकरितां बहुजनसमाजांत विचारजागृति करणें, म्हणजे त्या वर्गाचाच व्यवसाय तेवढा अनीतीचा आहे, अशी प्रस्तुत लेखकाची एकांगी समजूत मात्र खास झालेली नाहीं.

अनीति आज सर्वत्र पसरली आहे. तेव्हां पतित स्त्रिया आपलें जीवन ज्या

एका तऱ्हेच्या व्यवसायानें घालवीत आहेत, तो व्यवसाय नीतिमूलक नाहीं. त्याचें स्वरूप दृश्य असल्यामुळें इतर समाजावर त्याचा विपरित परिणाम होत असतो, म्हणून त्याचें उच्चाटण योग्य मार्गांनीं होणें आज अत्यावश्यक झालें आहे. अनीतीच्या ह्या प्रकाराबरोबर समाजांत अनीतीचे इतर प्रकारहि चालू आहेत. सिनेमा नाटकें, अश्लील व शृंगाररसांनीं ओथंबलेलें

## ' फद्या मालां ' चें वाङ्मय,

हीं नीट अभ्यासिलीं तर त्यांतील प्रकार हिडीस, गलिच्छ व अनीतिकारक असल्याचेंच प्राय: आढळून येईल.

पतित स्त्रियांचा व्यवसाय अनीतीचा आहे, तो आज ना उद्यां कांहीं तरी उपायांनीं नाहींसा करतां येईल; परंतु वेश्येतर उच्च म्हणविणाऱ्या पांढरपेशा समाजांत, हल्लींच्या वातावरणाचा कांहीं विपरित परिणाम झाल्यामुळें म्हणा, प्रच्छन्न स्वरूपांत अनीतीचे जे उद्वेगजनक प्रकार रात्रंदिवस चालू आहेत, ते मुळापासून उखडून काढणें अति गुंतागुंतीचे होऊन बसलें आहे. * अशा प्रकारांचा उघड निषेध करणारे परंतु पडद्याआड त्या प्रकारांचीं

## नाटकें रंगविणारे भोंदूबुवा

तर प्रमाणाबाहेर सांपडतील! अनैतिकाचरण करणाऱ्या वर्गाबद्दल प्रस्तुत लेखकाला जितकें वाईट वाटतें आहे, त्याच्या अधिकपट पांढरपेशा गृहस्थी मंडळींच्या प्रमाणबाह्य अनैतिक आचरणाबद्दलहि मनस्वी तिटकारा वाटतो आहे. मनाला डंवचणाऱ्या शल्याचा स्फोट न करणें हें कोणत्याहि निर्भीड लेखकाला पटावयाचें नाहीं. करितां प्रस्तुत लेखकाच्या स्पष्टोक्तीबद्दल शालशिष्टांनीं त्याला क्षमा करावी.

आमच्या आयाबहिणींचे, आमच्या लेकी सुनांचे किंबहुना आमच्या आव-

---

* "Public prostitution and the half-world apart, there is in modern cities 'a much more extensive *Secret* prostitution' ", Lajpat Rai's 'Unhappy India,' p. 228.

डत्या सहधर्मचारिणी (?) चे पातिव्रत्याचे पदर केव्हां केव्हां परोक्षापरोक्ष विसकटले जात असतांना ते सांवरून न धरण्याइतकी आम्ही बरीचशी बावळट मंडळी आज निवळ दळी बनलों आहोंत. संसाराचा बोजा वाहण्याकरितां आम्ही घराबाहेर पडावें, आणि इकडे पश्चात् आमच्या सौभाग्यवतींनीं दिवसाढवळ्या नाटकशाळा करावी, अनीतीचे हेव ते प्रकार मन:पूत करून, पुन: आम्हासमोर पातिव्रत्याचा मोठा टेंभा मिरवावा ! अशी परिस्थिति आज चोहें कडे झाली आहे. धोपटमार्गी स्वजनांची ओळख न पटण्याइतकीं आमचीं बुबुळें उरफाटीं फिरलीं आहेत. धर्माचे नीतिमत्तेचे, वगैरे सारे सिद्धांत मागें एकदां

## आमच्या ऋषितुल्य बापजाद्यांनीं

लिहून ठेविलेल्या ग्रंथांत सुरक्षित आहेत ! सध्यांच्या आमच्या 'स्वतंत्र' जीवनक्रमाला त्यांची जरूरी मुळींच नाहीं, अशा कल्पनापिशाच्यामुळेंच आमचें सारें नैतिक जीवन आज पछाडलें गेलें आहे.

कांहीं सामाजिक-धार्मिक रूढ समजुतींचा नायनाट होण्याकरतां आमच्या सुशिक्षित स्त्रीवर्गानें बंडाचें निशाण उभारावें, अशा समजुतीनें आम्ही आमच्या त्या स्त्रीवर्गाला आधुनिक पद्धतीचें आंग्रेजी शिक्षण देऊन, व्यक्तिस्वातंत्र्याची त्यांना जी मोकळीक देत असतों, त्याचा मात्र आज विपरित परिणाम होऊं लागला आहे. आमच्या हिंदुसमाजांतील स्त्रीवर्गाचें नैतिक जीवन उद्यां कोणत्या प्रकारचें बनेल, या प्रश्नाबद्दल बरेच विचारी समाजधुरीण आज साशंक आहेत !

## तरुण तरुणींच्या प्रेमाचीं नाटकें

वैवाहिक बंधनांच्या बोहल्यावर साक्षी जनांसमोर साजरीं न होतां, तीं अंधेऱ्या जागांतून गुपचूप होऊं लागलीं आहेत. 'अप्-टु-डेट' प्रसक्रीडांचें थैमान दिवसाढवळ्यादेखील चालू आहे, वगैरे प्रकार लोकांपुढें स्पष्टपणें मांडणें म्हणजे तें एक

## 'मिस मेयो' धाडस

आहे, किंवा तो लेखकाचा उच्छृंखलपणा आहे, माथेफिरूपणा आहे, अशी

कुणि सोंवळ्या विचारांच्या मण्डळींनीं आपली मल्लीनाथी लढविली, तर तें हास्यास्पद ठरेल. लेखकाची भाषा व तडफ हीं वरपंगीं कुणाला कर्णकठोर जरी भासलीं, तरी त्यामध्यें लेखकाच्या तळमळीचा ओलावाहि बराच असतो, हें मात्र कुणीहि विसरतां कामा नये.

वेश्यावर्गासंबंधीं कुणि जर चार शब्द लिहूं लागला, तर त्याबद्दल इतरांनीं आपलीं सरळ नाकें मुरडल्यास खुशाल मुरडावींत. परंतु प्रस्तुत विषयावरील हें एक लहानसें चोपडें प्रसिद्ध केल्यामुळें आमच्यासारख्या एका गरीब परंतु निर्भीड लेखकावर नसते घाणेरडे आरोप करण्याचें कुणी हि धाष्टर्य करूं नये. कारण, साऱ्या हिन्दुसमाजाचा नैतिक दर्जा आज कोणत्या पायरीवर आहे याचा इतिहास स्पष्ट आहे. त्याबद्दल निराळी साक्ष पटविण्याकरितां निराळ्या प्रमाणांची मुळींच जरूरी नाहीं. राष्ट्रहिताच्या दृष्टीनें प्रस्तुत ' त्याज्य ' विषयाचा आमच्या वाचकांनीं नीट अभ्यास करून, त्यावर योग्य विचार करून, सज्जन आणि विद्वान् अशा समाजधुरिणांच्या हाकेला निदान आपली ओ जरी दिली, तरी तें फलद्रूपच होईल, अशी प्रस्तुत लेखकाला आशा आहे.

२६, लोअर चेन्दणी, ठाणें.
ता. १ ऑगष्ट १९२९.

सर्वसज्जनांचा नम्र,
**लेखक.**

# हिन्दु समाज
## आणि
# पतित स्त्रियांची सुधारणा. *

हिंदुसमाजांत जातिभेदांची माजलेली वजवजपुरी आज आपणाला कितीहि तीव्रतेनें भासूं लागली, तरी ती नाटकांतील ट्रान्स्फर-सीनसारखी चुटकीसरशी पालटणें शक्य नाहीं. आज हिन्दुसमाजांतील—ज्यांचीं मनें प्रबुद्ध झालीं आहेत, अशा—संस्कारवंत मण्डळी ( Men of culture ) ला आपली अमूक एक जात सांगण्यापेक्षां आपण ' हिन्दु ' आहोंत असें म्हणण्या—म्हणविण्यांत अधिक भूषण वाटतें. विश्वबंधुत्वाचें रहस्य जाणणारीं उदारचरित मण्डळी फार थोडी. या मण्डळीशिवाय इतर जो अफाट बहुजनसमाज, त्याचा गतानुगतिक दृष्टिकोण बदलावा, मनांतील रूढ कल्पना नाहींशा व्हाव्यात, एवढ्याचकरितां प्रस्तुत स्थळीं चार ओळी लिहिण्याचें आम्ही धाष्टर्य करीत आहों.

राजकीय स्वातंत्र्याकरितां आज आम्ही आघाडी मारण्याचा जो प्रयत्न करीत आहों, तो आपापसांतील उच्चनीच दर्जा व निरनिराळे जातिभेद बाजूला ठेवूनच करीत आहोंत. राजकीय क्षेत्रांत वावरतांना आमची दृष्टि प्राय: जशी राष्ट्रीय असते, तशीच निर्मळ दृष्टि आम्ही आपल्या सामाजिक क्षेत्रांतहि ठेविली पाहिजे. आमची हिंदु संस्कृति मुळांतच उज्वल असल्यामुळें

## कुराण-बायबलांच्या सरबत्तीला

बळी न पडतां, ' हिंदु ' म्हणून आम्ही आजवर जिवंत राहिलों ! आमच्या या संस्कृतीवर आज धुरळा बसल्याची आम्हीच जी दवंडी पिटतों, तिला कारण मात्र

---

* प्रस्तुत लेख मुंबई, ' संदेश ' पत्रांत ता. १६, १७ व १८ मे १९२९ रोजीं प्रसिद्ध झाला, तो आज या ठिकाणीं सुधारून वाढविला आहे.

आमचे आम्हीच आहोंत. रूढीबद्दल, चालीरितींबद्दल, आम्ही केव्हां विघातक प्रहार करून वेसुमार हाकाटी करतों. त्या रूढीचालीरीतींचें जनकत्व आमच्याचकडे आहे, ही गोष्ट मात्र आम्ही अजिबात विसरून जातों.

कालाच्या गतीबरोबर जगाचा पालट होत असतो, मानवी समाजांत विचारक्रांतीची ज्योत आस्ते आस्ते प्रज्वलीत होत असते, त्यावेळीं अशा तऱ्हेच्या संक्रमणावस्थेची बेमालूम जाणीव झालेली प्रबुद्ध मंडळी बाकीच्या बहुजनसमाजाला त्या त्या विचार-संक्रमणावस्थेची जाणीव करून द्यावयाला—स्वार्थाचा गुणाकार न करतां—'Greatest good of the greatest number'—सर्वांचें पुष्कळसें हित साधण्याला—केव्हांहि तयार असते. अशा वेळीं नव्या जुन्याचें द्वंद्व मात्र कांहीं काळ चालूं राहून, जुन्याला चिकटलेला बहुजनसमाज, नवविचारांचीं इन्जेक्शनस् वरचेवर मिळत गेलीं, म्हणजे जुन्याचें बारावें घालून,

नव्याचें बारसें

घालावयाला हळुं हळूं तयार होत असतो.

परंतु या ठिकाणीं आमच्या वाचकांनीं एक गोष्ट मात्र विसरतां कामा नये, कीं बहुजनसमाजाला नवविचारांची जाणीव करून देतेवेळीं पुढाकार घेणाऱ्या अल्प-संख्याक लेखाळ वाचाळ मंडळींना आपलें बरेंचसें नुकसान करून घ्यावें लागतें. इतकेंच नव्हे, तर कांहीं प्रसंगीं त्यांना आपल्या जीवित सर्वस्वालाहि मूठमाती द्यावी लागते.

आमचा हिंदुसमाज आज आपली सर्वांगीण सुधारणा करण्याकरितां मोठ्या आटोरटीनें प्रयत्न करूं लागला आहे, तेव्हां अशा तऱ्हेच्या एकंदर चालू वातावरणाचा फायदा घेऊन, प्रस्तुत लेखक एका सामाजिक परंतु नाजूक प्रश्नाकडे आपल्या हिंदुसमाजांतील विचारी मंडळीचें योग्य लक्ष वेधण्याचा प्रयत्न करीत आहे.

ज्या आमच्या हिन्दु पुढाऱ्यांनीं अस्पृश्यतेसारखे व पतितपरावर्तनासारखे प्रश्न कायमचे सोडविण्याकरितां प्रयत्न चालविले आहेत, त्यांना अनैतिक प्रकारांनीं जविन कण्ठणाऱ्या

## पतित स्त्रियांचा* उद्धार

करतां येत नाहीं, असें कुणि म्हटल्यास तें मात्र चूक ठरेल.

आमच्या समाजधुरिणांनीं आजवर या प्रश्नाकडे विशेषसें लक्ष न देण्याचें कारण असें, कीं अखिल हिंदुसमाजाच्या प्रगतीच्या प्रश्नांपैकीं हा प्रश्न असावा तितका महत्त्वाचा त्या वेळीं नव्हता. पण अस्पृश्य बांधवांना आम्ही आपल्याजवळ न केल्यामुळें त्यांतील बरीच मण्डळी परधर्मांच्या गोटां शिरूं लागलीं व पूर्वी

## इस्लाम–क्रिस्तीधर्मांचीं पांघरुणें

घेतलेल्या मंडळींचीहि स्थिति मोठी केविलवाणी होऊं लागली. अर्थात् अशा तऱ्हेचें हिंदुसमाजाला लागलेलें ग्रहण आधीं सुटावें, म्हणून आमच्या पुढाऱ्यांनीं पहिल्यांदा वरील प्रश्न हातीं घेतले. याहि प्रश्नकडे आतांशा बऱ्याच मंडळींचें लक्ष लागलें आहे, ही एक समाधानाची गोष्ट आहे. शिवाय उपरोक्त वर्गाकडे आमच्या पुढारी मंडळींनीं विशेष लक्ष न देण्याचें कारण असें, कीं आमच्यामधील सधन पण खुशालचंद मंडळींनीं आपले

## अनैतिक चैनबाजीचे प्रकार

चालवितां न कळत या वर्गाचें जीवन आजवर टिकवून धरण्याला एका तऱ्हेची मदतच केली; आणि त्यामुळें या वर्गाची प्रगति होऊं इच्छिणाऱ्या आमच्या पुढारी मंडळीला बराचसा प्रतिकार झाला व अजून होतहि आहे.

अनीति, अनीति म्हणून जिला आम्ही संबोधतों, ती जगांतील प्रत्येक समाजांत आहे. असा एकहि समाज नाहीं, कीं तो अनीतिपासून सोंवळा राहिला आहे. वैभवाच्या शिखरावर पोहोंचलेलें कोणतेंहि उन्नत राष्ट्र घ्या; त्यांत अनीति ही

---

* **पतित स्त्रिया**:–वेश्या, नायकीणी, कलावन्तीणी, भाविणी, मुरळ्या, वगैरे तऱ्हेचीं निराळीं नांवें न योजतां, या शब्दामध्यें गोवें, कारवार, कोंकणपट्टी, बेळगांव, धुळें, मुम्बई, वगैरे ठिकाणीं हल्लीं असणाऱ्या साऱ्या एकजात मराठा गायक–समाजाचा अंतर्भाव प्रस्तुत लेखकानें केला आहे.

थोड्याबहुत प्रमाणांत आहेच आहे. ज्या मिस् मेयोसारख्या भवानीनें आमच्या राष्ट्राबद्दल आपले गलिच्छ विचार पाघळले आहेत, तिच्या मायदेशांतसुद्धां नगर-भवान्यांचा कांहीं तोटा नाहीं. अनीति फैलावण्यासाठीं पाश्चात्य राष्ट्रांतून तर रोज नव्या प्रकारांची सारखी चढाओढ चाललेली असते.*

शिवाय, गायकसमाजाची सुधारणा होऊं इच्छिणारा इतर समाजहि या अनीतिपासून अजिबात कोरडा राहिला आहे, असा कुणीहि आपला समज करून घेऊं नये. ज्या ज्या ठिकाणीं अनीति म्हणून असेल, त्या त्या ठिकाणाहून तिचें उच्चाटण करणें, हेंच आमच्या समाजधुरीणांचें आजचें कर्तव्य आहे.

आमचा इतिहास सांगतो इतकेंच नव्हे, तर परकी इतिहासकारहि आमच्या प्राचीन वैभवाचें कौतुक करतांना लिहितात:—" No Hindu was ever known to tell an untruth, no Hindu women ever known to be unchaste. " एका ग्रीक इतिहासकारानें काढलेले हे उद्गार प्राचीन काळच्या आमच्या हिंदुसमाजाबद्दल आहेत. त्या वेळीं कनक आणि कांता हीं ऐन रात्रीं जरी उघड्या मैदानावर असलीं, तरी तीं सुरक्षित रहात असत. परंतु तेव्हांचा तो काळ आतां मात्र पालटला आहे. आजच्या समाजाची घडी विसकटली आहे. ही विस्कटलेली घडी मोठ्या कुशलतेनें बसविण्यापूर्वी समाजांतील सूज्ञ व्यक्तींकडून त्याची योग्य विचारणा झाली पाहिजे.

हीन मानण्यांत आलेल्या एखाद्या समाजाला माणुसकीची योग्य जाणीव करून देऊन त्याला आपल्या पूर्व दर्जावर आणणें, म्हणजे त्याचें मन दुखावेल अशा तऱ्हेनें त्या समाजावर निरर्गल टीकेचा भडिमार करणें नव्हे; त्या समाजाला तुच्छ मानणें नव्हे; त्याची अवहेलना करणें नव्हे; तर आपणहि त्या समाजघटकांसारखीं माणसेंच आहोंत, देव नव्हत, ही आमच्या पुढारी मण्डळींनीं जाणीव ठेवून त्या समाजाबद्दल आपली सदयता, आपलें प्रेम, आपली सहानुभूति, आपला सक्रीय उदारपणा, हीं प्रकट करून, त्या समाजाला हरएक प्रयत्नांनीं आपल्या बरोबरीचा दर्जा प्राप्त करून देणें, यांतच समाजहित साधण्याची खरी गोम आहे. असो.

---

* Lajapat Rai's 'Unhappy India,' chap XVIII **Sex Urge in the West** हें प्रकरण अवश्य पहावें.

मूठभर असलेला गायकसमाज हा इतर 'न हिन्दुर्न यवनः' अशा हीन दर्जाच्या वेश्यावर्गापेक्षां शतपटीनें इभ्रतदार असून मुळांतच हिंदु असल्यामुळें, आमच्या योग्य प्रयत्नांनीं तो इतर समाजांशीं अल्पकालांत संलग्न होईल,

## हिंदु रक्त एकजीव होईल,

अशी आशा करण्याला पुष्कळच जागा आहे. गायकसमाजांतील ज्या कांहीं थोड्याशा मंडळीवर चांगले संस्कार घडले, ती मंडळी आज गृहस्थी पेशानें राहूं लागली आहे, हें त्यांना केव्हांहि भूषणावहच आहे. परंतु अशा मण्डळींनीं आपल्या पूर्वाश्रमींच्या समाजभगिनींना यापूर्वीच नीतिबोधाच्या चार गोष्टी पटवून त्यांना आपल्या व्यवसायाविषयीं तिटकारा उत्पन्न करण्याचे जर कांहीं प्रयत्न केले असते, तर आज या समाजांतील स्त्रीवर्गांत बरीच विचार–जागृति झाली असती. परंतु त्यांनीं असें न करण्याची कारणपरंपरा तूर्त इतकीच सांगतां येईल, कीं या मंडळीच्या घरांतील सांपत्तिक परिस्थितीचें यांच्या शिक्षणाला सहाय्य मिळाल्यामुळें उच्च विचारांच्या वातावरणाचा मनावर संस्कार घडल्यामुळें आणि इतर समाजांतील सुविद्य मण्डळीच्या योग्यतेप्रत पोहोंचल्यामुळें आपला स्वतःचा व आपल्या घरांतील इतर मण्डळीचाच तेवढा दर्जा, वैयक्तिक नात्याच्या दृष्टीनें सांभाळून, आपल्या एकंदर समाजाच्या प्रगतीकडे खास लक्ष देण्यांत व कांहीं प्रयत्न करण्यांत या मण्डळीला पूर्वी बराच संकोच वाटे. अशा तऱ्हेच्या परिस्थितींतून विद्वत्तेप्रत पोहोंचलेल्या मडण्ळींना आपल्या कुळाचा, गोत्राचा, समाजाचा जाहीररीत्या चार मण्डळींत उल्लेख करण्याचा प्रसंग आला, तर त्यावेळीं नाइलाज म्हणून ही मण्डळी बुरख्यांतल्या चोरट्या नजरेप्रमाणें सोवळी शब्दयोजना करीत असते. अशा तऱ्हेचा एकंदर सोवळेपणा ठेवण्यांत या मण्डळीला जरी कांहीं भूषण वाटत असलें, तरी प्रगतिप्रेमी तडफदार मण्डळीला तें मात्र रुचावयाचें नाहीं. उपरोक्त मण्डळीच्या समाजांतील सुधारणेचें कांहीं प्रश्न सोडविण्याकरितां यांच्या मताची नुसती अपेक्षा जरी करावयाची झाली, तरी त्या बाबतींतदेखील यांचे कोण आढेवेढे ! प्रत्येक खालच्या समाजांत आज हीच स्थिति आहे. एकदां आपली जीवननौका पैल तिरावर गेली कीं झालें. आपल्या मागून येणाऱ्या आपल्या बंधुभगिनींच्या नौका प्रतिकूल वाऱ्यांनीं भलतीकडे वाहील्या, तुफानांत सांपडून नेस्तनाबूद झाल्या, तरी पैल

गो. नं. ७२५५ दि. ९८४

तीर गांठलेल्या या मण्डळीला त्याची दखलच नसते. मनाच्या बनलेल्या या वृत्तीला भ्याडपणा इतकेंच तूर्त म्हणतां येईल.

ह्या गायकसमाजाचें मुख्य क्षेत्र जो गोवें प्रांत, त्या प्रांतांतील वैश्य आणि सारस्वत समाज यांच्या हातीं त्या प्रांतांत बरीच सत्ता असतांहि आपल्या या पतित भगिनींना योग्य मार्गाला लावण्याचें त्यांनीं आजवर करावे तितके मननीय प्रयत्न केले नाहींत. याचें कारण असें, कीं कांहीं थोड्या व्यक्तीशिवाय सामुदायिक चळवळींचे प्रयत्नच झाले नाहींत. तसें जर होतें तर परवां शिरोडें मुक्कामीं भरणाऱ्या 'पोर्तुगीज शिक्षण प्रसारक मराठा समाजा' च्या परिषदेपुढें वरील स्त्रीवर्गाच्या सामाजिक दर्जासंबंधीं जे प्रश्न आले ते मागेंच सुटले गेले असते.

सारांश, गोमांतकांत सरकारदरबारीं वजन असणाऱ्या वरील उच्च वर्णीय समाजांनीं योग्य काळीं प्रस्तुत प्रश्नाची विचारणा केली नाहीं, चाललेला प्रकार सनातन आहे, धार्मिक आहे, कीं रूढीजन्य आहे, याची कांहींच चर्चा केली नाहीं, म्हणूनच गोव्याच्या बोटी मुंबईच्या बंदरीं येऊन थडकल्या; म्हणूनच

## गोव्याचा मेवा मुंबईच्या बाजारपेठेंत

विशेष खपूं लागला. मुलींचे 'शेष' विधि करून त्या देवाच्या नांवें माणसालाच राक्षसी हृदयानें अर्पण करण्याच्या चालीला त्या समाजांनीं आजवर जिवंत ठेविलें. * त्या चालीचे त्यांनीं आजवर धार्मिक सबबीवर बरेंच कोडकौतुक केलें; आपले चैनबाजीचे, इष्कांचे छंद पुरे व्हावेत, आपली तुंबडी भरावी, म्हणून भिक्षुकी नजरेचा रोख कायम ठेविला इतकेंच नव्हे, तर आमच्या इंग्रज सरकारनें राजकीय चळवळ करणाऱ्या जनतेवरदेखील आपला कटाक्ष ठेविला नसेल, इतका कटाक्ष गोव्यांतील आमच्या या महाजन ( ? ) मंडळींनीं, आपली प्रगति करून घेणाऱ्या मराठा गायक समाजावर ठेविला आहे. ब्राह्मणेतरांकडून नामाभिदान पावलेली

---

* 'शेषविधि' हा अनीतीचा प्रकार, किंवा अनीति फैलावण्याला त्याची मदत होते, असें कुणि मनांत आणिलें असतें, तर गोवेंसरकारच्या 'Portuguese Penal Code' मधील कलम ४०६ चा बराच उपयोग करून घेऊन त्यांना 'शेषविधि' हा केव्हांच बंद करतां आला असता.

महाराष्ट्रांतील ' शिक्षुकशाही ' एकवार पुरवेल; परंतु गोव्यांतील ब्युरोक्रॅटिक महाजनशाही मुळींच पुरवणार नाहीं. ती सरकारी कायद्यापेक्षांहि जुलमी व जाचक आहे, अशी तिकडील इतर समाजांची ओरड आहे. आणि एवढ्याकरितांच आह्मा महाराष्ट्रीयांना अलीकडे वरील प्रश्नांची जाणीव तीव्रतेनें होऊं लागली आहे.

आमच्या कांहीं विचारी मंडळीला वेश्यांचीं विलासमंदिरें नैतिक दृष्टीनें आज जरी स्मशानमंदिरें भासूं लागलीं, तरी थोड्याच वर्षांमागें तीं आमच्या एकंदर सोंवळ्या—ओंवळ्या श्रीयुत—पदवीधरांचीं देखील विलासस्थानें होतीं, आणि अजूनहि आहेत. पूर्वीं या स्त्रियांना लाखोपति ' शेटी ' मिळत. याचें कारण सांपत्तिक दृष्टीनें तो काळच कांहीं वेगळा होता. परंतु आजची आर्थिक परिस्थिति विलक्षण झाल्यामुळें वरील चैनी निशाचरां ( Heroes of the nights ) चे खिसे बहुतेक खालावले आहेत. त्यामुळें आज या स्त्रियांची स्थिति बरीच निराशाजनक झाली आहे.

आपल्या जन्मप्राप्त व्यवसायाचा वीट येण्याचें केव्हां केव्हां मात्र या बायांना

## स्मशान-वैराग्य

आठवत असतें. परंतु तें प्रतिकूल परिस्थितीमुळें व नाटकी राहणीच्या विचारपरंपरेंतून उत्पन्न झाल्यामुळें नकलीच असतें. स्वतःची गोष्ट वेगळी; परंतु आपल्या भावी पिढीच्या प्रगतीच्या दृष्टीनें तरी आपल्या चालू व्यवसायावर लाथ मारण्याची धमक या बायांत रहात नाहीं, याचें कारण मात्र स्पष्टच आहे, कीं उपजीविकेच्या साधनाला या व्यवसायाशिवाय त्यांना अन्य मार्गच नसतो. संपत्तींत लोळणाऱ्यादेखील स्त्रियांना आपल्या

## कोंवळ्या मुलीबाळींची हातलावणी

करण्याचा मोह जर आवरतां येत नाहीं, तर मध्यम स्थितींतील स्त्रियांची गोष्टच नको. बरें, तिशी चाळिशी उलटलेल्या कांहीं बायांनीं आपल्या या निंद्य व्यवसायावर आज तिलांजली सोडली, आणि एखाद्या गृहस्थाच्या सान्निध्यांत, संसारांत विधिपूर्वक राहून आपलें शेष आयुष्य घालविण्याचें आपल्या मनाशीं ठरविलें, तर तें कितपत शक्य होईल?

## स्मशानसान्निध लग्नाळु धनिक

—निवळ 'शारदें' तला 'श्रीमंत' च काय, परंतु तरणाताठा असा एखादा भणंग भिकारी इसमदेखील वरीलपैकीं एखाद्या बाईची लग्न-माळ घालून घ्यायला तयार व्हायचा नाहीं! कारण असले प्रकार बहुमतानें तरी हास्यास्पद ठरतील. असो.

या स्त्रीवर्गानें आजवर आमच्या नृत्यगायनादि कलेची थोडी थोडकी जोपासना केली खरी; एका दृष्टीनें त्यांचे आम्हावर हे उपकारच झालेत. परंतु दुसऱ्या दृष्टीनें त्यांनी आपलें जीवन अनीतीच्या व्यवसायानें घालविलें, हें मात्र समाजविघातक झालें. नृत्यगायनकलेवर दोन पैसे मिळविणें, हें जरी नीतीबाह्य ठरत नसलें, तरी उंबरठ्यांत येणाऱ्या कोणत्याहि जातीच्या, कोणत्याहि धर्माच्या वाटेल त्या खुशालचंदाला, कै देवलांनी म्हटल्याप्रमाणें:—

" नाट्य-गाननिपुण कलावतीची ही माया ॥
अंतरिचा भाव एक वरपांगीं दावि एक।
भिन्न भिन्न छाया " ॥—

अशा तऱ्हेच्या प्रेमपाशांनीं गुंतवून, त्याला आपलें शरीर ओपून पदरीं दोन पैसे बांधणें, हें मात्र कल्पनातीत नीतिबाह्य ठरेल.

हा व्यवसाय प्राचीन काळापासून अस्थित्वांत आहे, तो मनूच्या कालीं (खि. श. पूर्वी २००—इ. स. २००) चालू होता, हा व्यवसाय पूर्वी राजाश्रयाखालींहि चालू होता, किंवा 'देवदासी'* बनविण्याचा चालू प्रकार नवव्या दहाव्या शतकांपासून आजवर जिवंत राहिला आहे, किंवा या व्यवसायामुळें अविवाहितांची व बाहेरख्याली इसमांची खाणावळीप्रमाणें 'उत्तम सोय' लागते, म्हणून

* "System of religious prostitutes is of great antiquity, the caste of temple--women, seems to have first risen to prominence about the ninth or tenth centuries A. D."
S. M. EDWARDES'S 'CRIME IN INDIA,' P.79-80.

तो व्यवसाय पुढेहि चालू रहावा, असें कुणि म्हणूं लागेल तर त्याचें तें म्हणणें आज पशुवृत्तीचेंच ठरेल !

वेश्यावर्ग होता म्हणून आमच्या समाजांत अनीतीचा रोग फैलावला नाहीं, असें म्हणणें शुद्ध गाढवपणाचें ठरेल. आपल्या गृहस्थवर्गांत एखादें नीतिबाह्य वर्तन न करतां, वरील तऱ्हेचा धंदा करणाऱ्या वर्गांत जाऊन केलें, तरी तें अनैतिकच ठरेल. कुणि कोणत्याहि तऱ्हेनें एखादा व्यवसाय सुरूं केला, आणि तो बहुजनसमाजाच्या चारित्र्याला कलंक फांसणारा असला, तर त्याबद्दलची जबाबदारी आईबाप किंवा पालक यांजवर आहे.

## लग्नाळू तरुणांची विषयोपभोग–क्षुधा

वेळींच शमविण्याची तजवीज करणें.व त्यांना अनैतिक प्रकारांत पडूं न देणें, अवेळींच

## बारटनचे चष्मे

लावूं न देणें, हें त्यांचें कर्तव्य आहे. तरुणतरुणी हीं आपले प्रेमसंबंध विवाहाच्या मार्गानें उघडपणें न करतां, ते प्रेमाच्या चोरट्या मार्गानें पडद्याआड करूं लागतात, हा परिणाम हल्लींच्या शिक्षणपद्धतीचा किंवा वातावरणाचा असेल, तर त्याची सारी जबाबदारी समाजपुढाऱ्यांवर आहे, हें विसरतां कामा नये. सुधारांच्या यच्चयावत् अनैतिक प्रकारांचा सामुदायिक चळवळींनीं किंवा जहाल कायद्यांनीं बीमोड करणें, हें आमच्या समाजपुढाऱ्यांच्या जरी हातीं आहे, तरी सार्वत्रिक फैलावलेल्या अनैतिक रोगांच्या साथीला त्यांनीं एकदम शह देणें, हें बोलण्याइतकें

---

बौद्धकालीं अकालीं झालेल्या विधवांचा 'भिक्षुणींचा' वर्ग विहारांतून रहात असे. देवदास्यकरतां करतांच यांच्यांत अनीति पसरली. चिनी प्रवासी ह्युएनसंग लिहितो कीं, हर्षकालीं ७ व्या शतकांत देवालयांतील मूर्तिसमोर गाणाऱ्या स्त्रियांचें तांफे एकामागून एक येऊन गायन करीत. 'देवदासीं' चा पूर्वींचा प्रकार आतांच्याहून फार निराळा होता. त्यांचे नैतिकाचरण व धर्मज्ञान वगैरे प्रशंसनीय होतीं, तें सर्व आतां कालाच्या उदरांत गडप झालें. त्याचें आतां काय ? आज मात्र आपणांपुढील जी स्थिति आहे, ती पालटण्याचेंच काय ते उपाय योजले पाहिजेत.

मात्र सोपें नाहीं. त्यांच्या यशप्राप्तीला इतर लहान मोठ्या समाजांनींहि भागीदार होण्याची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली पाहिजे.

समाजहिताची चिंता वाहणारी मण्डळी काया–वाचा–मनेंकरून उपरोक्त पतितस्त्रियांचा प्रश्न सोडविण्याचा आतांशा जो प्रयत्न करीत आहेत, त्याला शक्य ती मदत करणें, हें त्या समाजांतील विचारी मण्डळीचें मुख्य कर्तव्य आहे. त्या समाजांतील तरुण मंडळी आज थोडेसें जें कार्य करीत आहे, त्या कार्याला नुसत्या पैशाची मदत करून, किंवा त्या कार्याबद्दल सहानुभूतीच्या नुसत्या माना डोलावण्यानें आज आपल्या दृष्टिसमोर जिवंत असलेला अनीतीचा प्रकार लवकरच नाहींसा होईल, अशा भविष्याचा बिनचूक आंकडा निदान आज तरी आमच्याच्यानें सांगवत नाहीं.

आतांपर्यंत धंद्यांत पडलेल्या स्त्रियांचा प्रश्न राहूं द्या; परंतु यापुढें तरी त्यांनीं आपल्या भावाबहिणींना, मुलांमुलींना योग्य मार्गाला लावण्याचें मनावर घ्यावें. बहिणींना व मुलींना राक्षसी जीवनांत न लोटतां, भावांना व मुलांना सारंग्ये तबलजी न बनवितां, त्यांना चांगलें शिक्षण देऊन उत्तम नागरिक बनविण्यांतच खरें राष्ट्रहित आहे. घरांतील वडीलधाऱ्या मण्डळीच्या राक्षसी धाकानें किंवा धनतृष्णेनें या निंद्य धंद्यांत पडलेल्या व पाडलेल्या परंतु आतां पश्चात्ताप पावणाऱ्या तरुण मुलींनीं कार्य करण्याचें किंवा कोणत्या तरी एका नैतिक मार्गानें आपलें जीवन घालविण्याचें मनावर घेतलें, तर तें फलदायीच ठरेल. इतकेंच नव्हे, तर एकदां वांकडें पाऊल पडलेल्या कांहीं होतकरू मुलींनीं लग्न करण्याचें जरी ठरविलें. तरी आमच्या हिन्दुसमाजाला तें अपायकारक होईल असें आह्माला वाटत नाहीं. कारण, आमच्या पांढरपेशा समाजांतील कांहीं जातींत लग्नाचा पहिला नवरा आटोपला, कीं पुढें त्याच्या मागून दुसरा, तिसरा, अशा नव्या नव्या नवऱ्यांच्या आवृत्त्या क्रमानें होत असतात ! मग एखाद दुसऱ्या 'शेटी' चा जडलेला कायम संबंध अजिबात तुटल्यानंतर उपरोक्त मुलींमध्यें योग्य मार्गानें

## बोहल्यावर चढण्याची प्रेरणा

झाली, तर तें नीतिसम्मतच ठरेल ! 'आवजाव घर तुमारा' अशा घाणेरड्या जीवनापेक्षां वैवाहिक बंधनाची श्रेष्ठता कांहीं निराळीच आहे.

कावन्तांमध्यें आतांशा विवाह जरी होऊं लागले आहेत, तरी त्यांचे प्रमाण अजूनपावेतों समाधानकारक नाहीं. शिवाय, ह्या विवाहांची अंतिम कल्पना व्यापक नसून कूपमंडूकवृत्तीची आहे. आपल्याच एका समाजांत हे विवाहसंबंध होऊं न देतां, मुलांमुलींचीं—विशेषत: मुलींचीं विवाह–बंधनें इतर ज्ञातिसमाजांतील सुशिक्षित मंडळींबरोबर घातलीं, तर कलावन्तवर्गाचा, साऱ्या गायकसमाजाचा जातभेदाच्या दृष्टीनें, हीन मानण्यांत आलेला दर्जा नाहीसा होईल; हिंदुसमाजांतील जातिभेदपिशाचाला हुसकावून लावण्याच्या कार्यांत भागिदार झाल्याचेंहि श्रेय मिळेल !

विवाहांच्या बाबतींत प्रस्तुत स्थलीं एका गोष्टीचा प्रामुख्यानें उल्लेख करावासा वाटतो, तो हा कीं कोणत्याहि ज्ञातिसमाजांत होणारे सारेच विवाह प्रेममूलक नसतात. विवाहाची जुळवाजुळव पायरी पायरीनें होत नसते. परिचय प्रेम आणि नंतर विवाह, अशा पायऱ्या आहेत. परिचय हा शुद्ध हेतूने व सभ्यवर्तनानें व्हावयास पाहिजे. परिचय दृढ होतेवेळींच प्रेमाचा अंकुर फुटूं लागतो. पण हें प्रेम निवळ विषयपिपासेचें असतां कामा नये. तें प्रेम शुद्ध असून, भावी जीवनाला पोषक असें असलें पाहिजे. हल्लींच्या तरुणतरुणींनीं नाटकी प्रेमाचें सोंग न घेतां, कादंबऱ्या व नाटकें यांतील शब्दचित्रांची आपल्या प्रत्यक्ष कृतीनें तालीम ( Rehearsal ) करण्यासाठीं म्हणून खोट्या प्रेमाचा आव न आणितां Marie Corelli च्या " Thelma " कादंबरींतील ( पृ. १३७ ):—

" Lovest thou me for my beauty's sake ?
Love me not then !
Love the victorious, glittering Sun,
The fadeless, deathless, marvellous One !
Lovest thou me for my youth's sake ?
Love me not then !
Love the triumphant, unperishing spring,
Who every year new charms doth bring !
Lovest thou me for treasure's sake ?
Oh, love me not then !

[stamp] मि. ६

Love the deep, the wonderful Sea,
Its Jewels are worthier love than me !
Lovest thou me for Love's own sake ?
Ah, Sweet, then love me !
More than the Sun, and the Spring and the Sea,
Is the faithful heart I will yield to thee ! "

प्रेमाची ही शुद्ध व स्पष्ट व्याख्या समजून घेऊन मग प्रेमाची घोषणा करावी. विवाह जुळणें वा जुळविणें ही गोष्ट मोठ्या जबाबदारीची असल्यामुळें त्याचा विचार योग्य मार्गांनींच झाला पाहिजे. नाहींतर त्या तरुण मुलामुलींच्या आयुष्याचें मातेरें होण्याचा बराच संभव असतो.

विवाहाचीं सारीं लोटीं जमवितांना त्या तरुण युगुलांच्या बौद्धिक परिणतेच्या बलाबलाचा कांहींच विचार न करतां, केवळ द्रव्यबलाचीच वजावाकी करून शेंकडा नव्वद विवाह जुळविण्यांत येत असतात. गरीब–श्रीमंतीचें नाटकी वारें केवळ वरील समाजांतच नसून, इतर उच्चवर्णीय पांढरपेशा समाजांतहि तें मनस्वी आहे.

## नवरा-मुलगा शुद्ध शंख

असला, तरी लग्नाच्या बाजारांत त्याच्या सांपत्तिक ऐश्वर्यामुळेंच त्याच्या बौद्धिक किंमतींत उणेपणा मुळींच येत नाहीं. कारण, तो आपल्या श्रीमन्तीच्या कातड्यानें नखशिखांत मढविलेला असतो ! या प्रकारांचा समाजावर अप्रत्यक्षपणें विघातक परिणाम होऊन, पुढील पिढ्यांचें शील कोणत्या कसाला लावितां येईल, याबद्दलची समाजशास्त्रवेत्त्यांवर आज मोठीच जबाबदारी येऊन पडली आहे. समाजाचा हा दृष्टिकोण पालटून, विवाहांची जुळवाजुळव समाजहित विचारानें होत गेली, तर प्रत्येक दांपत्याला होणारी संतती उत्तम शिलाची व उज्वल चारित्र्याचीच निपजेल.

जातां जातां समारोप करावयाचा तो इतकाच, कीं आपल्या संसारामध्यें उत्तम उत्तम धातूंचीं भांडीं जरी असलीं, तरी कांहीं वेळां मातीच्या भांड्यांचा –मडक्यांचा–देखील बराच उपयोग करावा लागतो. शुभ कार्यांपासून अशुभ कार्यांपर्यंत त्यांची जरूरी लागत असते ! मडकें हें मातीचें–एका हीन पदार्थाचें

जरी बनविलें असतें, तरी तें एका विशिष्ट हेतूनेंच घडविलें असतें. पाणी वाहून नेण्याकरितांच कुणि तें आपल्या डोकीवर घेईल. आणि रिकामेंच घेऊन कुणि तें नाचवायला लागला, तर त्याचें तें करणें हास्यास्पद अतएव मूर्खपणाचें ठरेल! तेव्हां प्रसंगाकडे लक्ष देऊन, पालटणाऱ्या कालाचें महत्त्व लक्षांत घेऊन, एखाद्या हीन जातीय वस्तूला डोकीवर घेऊन नाचविलें, तर तें हास्यास्पद ठरावयाचें नाहीं. तद्वत् वेश्यावर्गाला प्रगतीच्या मार्गावर आणण्यासाठीं, राष्ट्रामध्यें इतर समाजां-सारखा त्याचा दर्जा त्याला प्राप्त करून देण्यासाठीं व हिंदु तेवढ्या व्यक्तीचें एकजीव संघटण होण्यासाठीं, उपरोक्त पतित समाजाला कांहीं काळ डोकीवर घेऊन जरी नाचविलें, त्याचा उत्कर्ष होण्यासाठीं त्यांतील सुविद्य,शिक्षित व होतकरू स्त्रीपुरुषांना आम्ही महत्त्व दिलें, हाताशीं धरिलें, तर आमचें तें करणें स्वाभिमानशून्यतेचें, उच्छृंखलपणाचें, मूर्खपणाचें, व्यभिचारप्रवृत्त्योद्दीपक नीचपणाचें आहे, असें बेगुमानपणें कुणि जर म्हणूं लागला, तर तो खास

## इरसाल राष्ट्रघातकी

असला पाहिजे.

तेव्हां, जातिभेदाचा वा दर्जाचा कोणत्याहि तऱ्हेचा पडदा लक्षांत न आणतां, आमच्या पुढारी मण्डळींनीं आपला रूढिमान्य सोंवळेपणा दूर सारून, हीन मान-ण्यांत आलेल्या समाजांना चुचकारून, सदयतेनें वागवून, त्यांना प्रगतीच्या मार्गावर आणण्याचें प्रयत्न करावयास पाहिजेत. राष्ट्रीय स्वातंत्र्याकरितां

## सामाजिक भेदभावांचीं मुळें

उखडून काढून, अखिल हिंदूचें अभेदभावाचें संघटण व्हायला एकजिनसी प्रयत्न झाले पाहिजेत. राष्ट्राच्या प्रगतीसाठीं प्रत्येक राष्ट्रघटक उदारचरित बनला पाहिजे. 'उदारचरितानां तु वसुधैव कुटुम्बकम्' हे विचार त्याच्या मनामध्यें अहोरात्र घोळले पाहिजेत. त्याच्या मनामध्यें उत्तम संस्कारांचें प्रबोधन झालें पाहिजे. हें जर वेळींच झालें, तर जगाच्या आजच्या चढाओढींत आपला हिन्दुसमाज पुन्हां आघाडी मारील व आपलें गतवैभव परत मिळवून,

जगाच्या शिरोभागीं बसेल ! इस्लामी रियासतीपासून आमच्या एकंदर हिन्दुसंस्कृतीवर वाढलेलीं बाण्डगुळें पार नाहींशीं होतील ! ! आणि **'रानटी गुलामांचें माहेरघर' म्हणून परकीयांकडून आज संबोधण्यांत येणारें आमचें हिन्दुराष्ट्र व त्याची सनातन संस्कृति हीं उद्यां**

## जगाच्या गुरुस्थानीं

आरूढ झाल्याशिवाय राहणार नाहींत ! ! !

* * * *

आह्मी लिहावयास घेतलेल्या **Prostitutes:**—Their genuine Purity & Present life, ह्या इंग्रजी ग्रंथांत प्रस्तुत विषयाचा समाजशास्त्रदृष्ट्या सांगोपांग विचार करणार आहोंत. स्थलाभावामुळें वाचकांची इथेंच रजा घेणें भाग पडत आहे.

४३८९

मु०॥ शिरोडें–गोवा, येथें तारीख २०–२१ माहे मे १९२९ रोजीं अहमदाबाद येथील गुजराथ कॉलेजचे इंग्रजी भाषा व तर्कशास्त्र या विषयांचे प्रोफेसर **रामचंद्र नारायण वेलिंगकर,** बी. ए. ( ऑक्सफर्ड ) यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या पांचव्या **'पोर्तुगीज शिक्षणप्रसारक मराठा समाज परिषदे'**पुढें वाचावयास पाठविलेल्या माझ्या पत्रांतील कांहीं भाग.

---

...... गोवें प्रांत व इतर ठिकाणीं असलेले मराठा गायक व तत्सम इतर समाज ह्यांच्या हितसंबंधाच्या दृष्टीनें पाहतां, ह्या समाजांना लागलेला वा लाविलेला काळिमा, निवळ सरकारी बगलेंत शिरून कायद्यांच्या अंमलबजावणीनेंच न घालवितां, इतर सोप्या पण परिणामकारक अशा कांहीं सामाजिक उपायांनीं धुवून काढण्याचे निश्चित प्रयत्न आज ह्या परिषदेला जमलेली मंडळी करतील अशी आशा आहे.

हिंदुधर्माच्या अफाट छत्राखालीं कालक्रमणा करणाऱ्या कोणत्याही दर्जाच्या समाजाच्या नसांनसांतील रक्ताचा, बहुजनसमाजाच्या निवळ अज्ञानामुळें मानण्यांत येणारा, कमीपणा चालू परिस्थितींत दृष्टि आड होणें अत्यंत जरूर आहे. स्त्री व पुरुष ह्या नैसर्गिक भेदाशिवाय, 'हिंदु' म्हटला कीं तो मग एकाच रक्तामांसाचा समजला पाहिजे. त्याचें रक्त, बीज व संस्कृति हीं अनार्य नसून, तीं, साऱ्या जगाला एका काळीं आपलें शिष्यत्व पत्करावयाला लावणाऱ्या अस्सल आर्यवंशाचींच आहेत; त्याचें जीवन एकजिनसी आर्यच आहे, अशी प्रत्येक हिंदुमात्राची खात्री होऊन, अन्धश्रद्धेला, रूढीला किंवा पुराणपरंपरेला आतांपर्यंत बळी पडलेल्या त्या हिंदुमात्राचा दृष्टिकोण पालटत नसला, तर तो पालटण्याचे योग्य ते उपाय केले पाहिजेत.

गायकसमाजामधील शिक्षण व विवाह ह्या दोन संस्थांमध्यें कर्झनशाहीचें वारें न शिरतां, आज आहे त्यापेक्षां त्यांचें स्वरूप अधिक व्यापक पण राष्ट्रीय होणें इष्ट आहे. वगैरे.

ठाणें, ता. १८
मे १९२९.

आपला नम्र,
विश्वेश्वर.

# चुकांची दुरुस्ती.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| २ | १९ | विषयापुरते | विषयापरते |
| ६ | १ | वजबजपुरी | बजबजपुरी |
| ७ | २५ | जंविन | जीवन |
| ८ | १५ | चैनबजीचे | चैनबाजींचे |
| १० | २१ | करीन | करीत |
| १२ | २ | शिक्षुकशाही | भिक्षुकशाही |
| १३ | ( या पानावरील | फुटनोट पुढील | पानावर चालू आहे. ) |
| १४ | १८ | बींमोढ | बींमोड |
| १४ | २१ | करतोच | करतांच |
| १५ | २ | आपक्ष्या | आपल्या |
| १६ | २ | कावन्तांमध्यें | कलावन्तामध्यें |
| १६ | ११ | का | कीं |


गोमांतक मराठा समाजाचें

## " समाज-सुधारक "

मासिक वा. व. १-१२-० मिळण्याचें ठिकाण—३१६ गिरगांव बॅक रोड,

मुंबई नं. ४

झालेले आहेत. पण हे प्रयत्न हाणून पाडण्यास गोमांतकीय महाजनशाहीकडून, समाजसुधारणेच्छू गायक तरुणांना संकटांत पाडण्याचे कसकसे नीच प्रयत्न करण्यांत येतात, याचें प्रत्यंतर स्पष्टपणें दिसून येत आहे. याची साक्ष आतां नव्यानें पटवून देण्याची आवश्यकता उरलेली नसून, ' **मराठा — गायक — मित्र** ' व ' **प्रगति** ' यांनीं ती केव्हांच बिनतोड पटवून दिलेली आहे.

शेवटीं श्री. विश्वेश्वर यांनीं आपलें लक्ष एका अत्यंत महत्त्वाच्या विषयाकडे वळवून, हिन्दुसमाजाची व गायक आणि तत्सम समाजांची कानउघाडणी करण्याची जी आज अल्पशी कामगिरी केली आहे, ती हिंदुधर्मरक्षक (!) हिंदुसभावाल्यांच्या आणि राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या मुळमुळीत गप्पा मारून, निवळ गुलाम बनवून ठेविलेल्या वेश्यांचे उंबरठे झिजविणाऱ्या वावदुकांपेक्षांहि फार प्रशंसनीय व स्मरणीय आहे.

हें छोटेंसें पुस्तक गायक व तत्सम समाजांतील प्रत्येक स्त्रीपुरुषानें—विशेषतः तरुणवर्गानें—अवश्य वाचून मनन करावें, आणि आपल्या पुराणकल्पनेला झुगारून, समाजकार्याला कांहींसा हातभार लावावा, अशी मी एक गोवेंकर बंधु त्यांना कळकळीची विनंति करीत आहें.

आपला नम्र,

मुंबई,
ता. १८–८–२९.

**मोतिराम बाबुराव जांबावलीकर.**

REFBK-0004341

४३४९

श्री. विश्वेश्वर यांचीं खालीले पुस्तकें छापत आहेत.

# रंगभूमीवरील व्यासपीठ.

अनैतिक प्रकारांचें आगर जें नाट्यविषय: त्यांत आकण्ठ बुडालेल्या आमच्या तरुण पिढीच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घालण्याकरितां नाटक, सिनेमा, क्लब, गाण्याचे प्रोग्राम्स, वगैरे अनेक मनोरम (?) विषयांची निर्भीड चर्चा केली असून, वहकणाऱ्या तरुणांच्या हिताच्या दृष्टीनें लिहिलेलें हें टीकात्मक पुस्तक सर्व तऱ्हेच्या व सर्व दर्जाच्या वाचकांना आदरणीय वाटेल, अशाच धोरणानें त्यांतील विषयमांडणी केली आहे.

---

# संभाजीची तुळशी (?)

संभाजीनें आपल्या जिवाची होळी करून घेण्यांत साऱ्या हिन्दूंना धर्माचें दिव्य कसें दाखविलें, व आजच्या 'हिन्दुसंघटणा'ला अशा तऱ्हेच्या आत्मयज्ञांची किती अवश्यकता आहे, वगैरे तऱ्हेची चर्चा करून, संभाजीच्या चारित्र्याला निखालस कालिमा फांसणाऱ्या नाटक-कादंबऱ्यांवर सप्रमाण निर्भीड टीका केली आहे.

---

मुद्रक:—बी. जी. गण्डभीर. धी न्यू आर्ट ॲण्ड लिथो वर्क्स,
ठाकुरद्वार, मुम्बई नं. ४.

---

प्रकाशक:—व्हो. ए. पाठारे. राघोबा शंकर रोड, ठाणें.

झालेले आहेत. पण हे प्रयत्न हाणून पाडण्यास गोमांतकीय महाजनशाहीकडून, समाजसुधारणेच्छू गायक तरुणांना संकटांत पाडण्याचे कसकसे नीच प्रयत्न करण्यांत येतात, याचें प्रत्यंतर स्पष्टपणें दिसून येत आहे. याची साक्ष आतां नव्यानें पटवून देण्याची आवश्यकता उरलेली नसून, '**मराठा—गायक—मित्र**' व '**प्रगति**' यांनीं ती केव्हांच बिनतोड पटवून दिलेली आहे.

शेवटीं श्री. विश्वेश्वर यांनीं आपलें लक्ष एका अत्यंत महत्त्वाच्या विषयाकडे वळवून, हिन्दुसमाजाची व गायक आणि तत्सम समाजांची कानउघाडणी करण्याची जी आज अल्पशी कामगिरी केली आहे, ती हिंदुधर्मरक्षक (!) हिंदुसभावाल्यांच्या आणि राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या मुळमुळीत गप्पा मारून, निवळ गुलाम बनवून ठेविलेल्या वेश्यांचे उंबरठे झिजविणाऱ्या वावदुकांपेक्षांहि फार प्रशंसनीय व स्मरणीय आहे.

हें छोटेंसें पुस्तक गायक व तत्सम समाजांतील प्रत्येक स्त्रीपुरुषानें—विशेषतः तरुणवर्गानें—अवश्य वाचून मनन करावें, आणि आपल्या पुराणकल्पनेला झुगारून, समाजकार्याला कांहींसा हातभार लावावा, अशी मी एक गोवेंकर बंधु त्यांना कळकळीची विनंति करीत आहें.

आपला नम्र,

मुंबई,
ता. १८–८–२९.

**मोतिराम बाबुराव जांबावलीकर.**

REFBK-0004341

८३४९

## WORKS BY THE SAME WRITER.

( IN PREPARATION. )

# MY MOTHERLAND OLD & NEW

A SPECIFIC SPECTACLES TO THE TO-DAY'S DEGENERATE YOUNG GENERATION OF INDIA.

## ECLIPSE OF "—' ISMS" OVER INDIA.

A RATIONAL TORCH THROUGH THE MAZES OF INDIAN CULTS & SECTS.

—:o:—

# PROSTITUTES:

## THEIR GENUINE PURITY & PRESENT LIFE.

[ This work will give an Ethnological and Historical Account of demoralized Hindu Communities emigrated from Konkan, Kanara and Goa province, and will also deal with some questions of the psychology of sexual life of these women, with a standpoint of our National Polity. ]

*Address*:—26, LOWER CHANDANI, THANA.